## ...आता

कपाळावरचा लाल डोह,
बेइमान झालेला हिरवा चुडा
आणि नागफणीसारखा डोक्यावरचा पदर
या सगळ्या दहशतीच्या जागा
कशा मोकळ्या झाल्या
तुझे अस्तित्व नष्ट झाल्यावर!

प्रत्येक क्षण किती घाबरायचा
तुला, तुझ्या जहरी नजरेला
तुझ्या प्रत्येक हुकुमाला,
विकृत स्पर्शाला
...आता सगळे निरभ्र झाले
तुला ज्वाळांनी वेढले तेव्हा!

माझे सगळे आयुष्य
वखवखलेस,
घर-दार
धुळधाणलेस
माझ्या अंगावरचे व्रण
आता निर्भीड साक्षीदार झाले
तुझ्या विकृत दहशतीचे!

माझ्या कपाळावर आता
मुक्त काळी चांदणी उगवलीय
सकाळचा सूर्य रोज स्वातंत्र्य घेऊन येतो
पंख लावून उडणाऱ्या मोकळ्या आकाशाचा
मला आधार मिळतो!

**-नारायण लाळे**

## वणवा

सातपुडा डोंगराला आग लागली
प्राणी, पक्षी, वनस्पती बेचिराख झाले
म्हणून जंगल अधिकाऱ्यांनी अग्नीशामक आणले
आग आटोक्यात आली
किमान पन्नास हजारांची जंगलसंपत्ती गेली
म्हणून जंगल अधिकाऱ्यांनी चौकशी केली
शेजारच्या झोपडीतून येणाऱ्या
दीनदुबळ्या आदिवासीला विचारणा झाली
बाबा रे, जंगलाला आग कशीकाय लागली?
त्यानं मानेनच खुणावत पुढे गेला
आभाळाकडं पाहिलं, हात जोडलं
अन् तोंडातल्या तोंडात पुटपुटला
हे निसर्गदेवा, हे नियमेश्वरा
जंगलाला लागलेली आग
सर्वांनाच दिसते रे...
गेली हजारो वर्षे
आमच्या पोटात पडलेली आग
कुणालाच कशी दिसत नाही?

**-संजय लोहकरे**